**नि दि.दा.क्र. १५४/२०१८**
**बाळकृष्ण विरुध्द कोंडीबा**
**निशाणी क्र. ६३ पुढे**

**वादीतर्फे साक्षीदार क्र.२ यांची पुढील सरतपासणी शपथेवर सुरु.**
**वादीतर्फे विधिज्ञ श्रीमती पी.एस. पाटील -**

मी प्रस्तुत प्रकरणाचे कामी माझे साक्षशपथपत्र दाखल केले असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास पूर्वीच नि.क्र.६३ देण्यात आलेले आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास प्रतीवादी क्र.१ ते ६ कडून विधिज्ञ श्रीमती बी.एम. कोरवार -**

हे म्हणणे खरे आहे की, वादी बाळकृष्ण जिजाबा पिसाळ हे माझे नातवोईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी कोंडीबा ठोंबरे हे देखील माझे नातेवाईक आहेत. प्रस्तुतचा दावा जमिनीबाबत आहे. वादीने त्यामध्ये खोटा दस्त झाल्याने त्यांची जमीन त्यांना मिळावी अशी मागणी केली आहे. सदरचा दस्त नेमका कुणी कुणाला करुन दिला याबाबत मला माहिती नाही. साक्षीदार सांगतो की, त्याबाबत आम्ही सन १९६५ साली चौकशी केली असता तसा पुरावा मिळून आला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, सन १९६५ नंतर त्या दस्ताबाबत मी चौकशी केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ वादींच्या सांगण्यावरुन तसा खोटा दस्त झाल्याचे मी खोटे सांगत आहे. सदरचा दस्त नेमका कोणत्या मिळकतीबाबत आहे हे मला सांगता येणार नाही. मला वादी व प्रतीवादी यांच्यात अपील प्रकरण दाखल असल्याचे सांगता येणार नाही.

**उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीक्रुत

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.11.11 15:14:58 +0530

दि. ११/११/२०२५

(आर.एम. भेंडे)

२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वाई.